# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः23.12.2025** **वारःमंगळवार**

---

•महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया आजपासून सुरू,

•माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेला सर्वोच्च न्यायालयाकडून स्थगिती,

•यंदाच्या पुणे पुस्तक महोत्सवात ३० लाखांपेक्षा अधिक पुस्तकांची खरेदी झाल्याची संयोजकांची माहिती

आणि

•महिला क्रिकेटमध्ये भारत आणि श्रीलंका यांच्यात विशाखापट्टणममध्ये आज वीस षटकांचा दुसरा सामना.

**<u>उमेदवारीअर्ज</u>**

राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया आजपासून सुरू होत आहे. येत्या ३० डिसेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज भरता येतील. ३१ डिसेंबर रोजी अर्जांची छाननी होईल आणि २ जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेता येणार आहेत. निवडणूक चिन्हांचं वाटप आणि अंतिम उमेदवारांची यादी ३ जानेवारी रोजी प्रसिद्ध होणार आहे. या सर्व महानगरपालिकांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होईल, तर १६ जानेवारी रोजी मतमोजणी होणार आहे.

**<u>प्राप्तीकरविभाग</u>**

राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकांमध्ये पैशांच्या वापरावर आळा घालण्यासाठी मुंबईतल्या प्राप्तीकर विभागानं चोवीस तास सुरू राहणारा नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे. निवडणूक काळात प्रचारासाठी बेहिशेबी रोकड, मौल्यवान वस्तू किंवा इतर प्रलोभनांबाबत नागरिकांनी जागरुक राहावं आणि ७७३८११३७५८ या क्रमांकावर त्याविषयीची माहिती द्यावी, असं आवाहन करण्यात आलं आहे.

**<u>महापालिकातयारी</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आगामी निवडणूकीसाठी अतिरिक्त मनुष्यबळाची आवश्यकता भासणार आहे, त्यानुसार जवळपास बारा हजार जणांची नियुक्ती करण्यात येत असून महापालिकेच्या वतीने त्यांना प्रशिक्षण दिलं जात आहे.

**<u>पुणेमनपा</u>**

पुणे महानगरपालिका निवडणुकीत राजकीय पक्ष आणि उमेदवारांना प्रचार सभांसाठी महापालिकेची मैदानं, शाळांची मैदानं, मोकळी जागा तसंच चौकांचा वापर करता येईल. यासाठी महापालिका प्रशासनानं अटी आणि शर्तीची नियमावली आणि दरपत्रक जाहीर केलं आहे. प्रचारादरम्यान रस्ते किंवा पदपथावर खड्डे केल्यास किंवा नुकसान झाल्यास दंड आकारला जाणार आहे. निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या सर्व आचारसंहितेतील सर्व कलमांचं पालन करणं बंधनकारक असेल, असं प्रशासनानं स्पष्ट केलं आहे.

**<u>मुख्यमंत्री</u>**

"भाजपा हाच राज्यातला सर्वात मोठा पक्ष आहे, हे नगरपालिका निवडणुकांच्या निकालातून स्पष्ट झाल्याचं" प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. नागपूर जिल्ह्यातल्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष आणि नगरसेवकांशी काल मुख्यमंत्र्यांनी नागपुरात आपल्या शासकीय निवासस्थानी संवाद साधला. यावेळी झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. २०१७च्या तुलनेत राज्यात भाजप नगरसेवकांची संख्या या निवडणुकीत दुपटीनं वाढल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

**<u>अजितपवार</u>**

राज्यातल्या विजयी नगराध्यक्ष आणि नगरसेवकांचं दोन दिवसांचं शिबीर पुण्यात यशदा इथं घेणार असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल सांगितलं. पुण्याजवळच्या फुरसुंगी उरुळी देवाची इथल्या नगराध्यक्ष आणि नगरसेवकांचा सत्कार त्यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. राज्यातल्या सर्व नवनिर्वाचित नगराध्यक्षांचं त्यांनी अभिनंदन केलं. या निकालाने सर्वांची जबाबदारी वाढल्याचं पवार म्हणाले.

**<u>हर्षवर्धनसपकाळ</u>**

नगरपरिषद, नगरपंचायत निवडणुकीत काँग्रेसचे ४१ नगराध्यक्ष आणि १ हजार ६ नगरसेवक निवडून आल्याचं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकात म्हटलं आहे. अत्यंत विपरित परिस्थितीतलं हे यश महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांना ऊर्जा देणारं आहे, असं ते म्हणाले.

**गडकरी**

भारताला जगातली तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था करण्यासाठी ज्ञान हे शक्तिशाली माध्यम असल्याचं प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलं आहे. ते काल मुंबईत आयआयटी पवई इथं एका कार्यक्रमात बोलत होते. कोणत्याही देशाचं भविष्य त्याच्याकडे असलेल्या तंत्रज्ञानावर अवलंबून असल्याचं ते म्हणाले. देशभरातल्या आयआयटी आणि त्यांच्या विद्यार्थ्यांचं देशाच्या विकासात आणि प्रगतीत मोठं योगदान असल्याचं त्यांनी नमूद केलं.

**लवासा**

पुण्याजवळच्या लवासा प्रकल्पाला कथित बेकायदेशीर परवानगी दिल्याबद्दल ज्येष्ठ नेते शरद पवार, सुप्रिया सुळे आणि अजित पवार यांच्या सीबीआय चौकशीची मागणी करणारी २०२३ सालची जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयानं फेटाळली आहे. पोलिसांनी याबाबतीत एफआयआर दाखल करावा असा आदेश न्यायालयाने देण्यासाठी कायद्यात तरतूद नसल्यामुळे ही याचिका फेटाळल्याचं उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने म्हटलं आहे.

**माणिकरावकोकाटे**

सदनिका घोटाळा प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेला सर्वोच्च न्यायालयानं स्थगिती दिली आहे. त्यामुळे कोकाटे यांची आमदारकी कायम राहणार आहे. सुनावणी पूर्ण होईपर्यंत कोकाटे यांना आमदार म्हणून अपात्र ठरवलं जाणार नाही, असं सांगत सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला नोटीस जारी केली आहे.

बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय सदनिका मिळवल्याप्रकरणी दोषी ठरलेले कोकाटे यांना जिल्हा न्यायालयाने दिलेली शिक्षा कायम ठेवत मुंबई उच्च न्यायालयाने त्यांच्या अटकेला स्थगिती दिली होती. कोकाटे यांनी या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं.

**<u>पुस्तकमहोत्सव</u>**

पुण्याची नवी सांस्कृतिक ओळख झालेल्या पुणे पुस्तक महोत्सवाची रविवारी उत्साहात सांगता झाली. तरुणाईचा उत्स्फूर्त सहभाग लाभलेला हा महोत्सव आता महाराष्ट्राचा महोत्सव झाला आहे, अशी माहिती संयोजक राजेश पांडे यांनी काल पत्रकार परिषदेत दिली. यंदाच्या पुणे पुस्तक महोत्सवाच्या वैशिष्ट्यांबाबत अधिक माहिती आमच्या प्रतिनिधिकडून ------

***<u>स्क्रिप्ट</u>***

*विविध भाषांमधील पुस्तकांची 800 दालनं, लहान मुलांसाठी चिल्ड्रनस कॉर्नर, दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रम, खवय्यासाठी 40 पेक्षा अधिक स्टॉल्स आणि जवळ जवळ दोनशे मान्यवरांनी विविध विषयांवर दिलेली व्याख्यानं, चर्चा, मुलाखती अशा भरगच्च कार्यक्रमांनी यंदाचा पुस्तक महोत्सव संस्मरणीय ठरला. महोत्सवा अंतर्गत झालेल्या 'पुणे लिट फेस्ट'मध्ये १२२ नामवंत वक्त्यांनी पुणेकरांशी संवाद साधला. परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर, अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांच्यासह साहित्य कला संस्कृती अशा विविध क्षेत्रातील नामवंतांना ऐकण्याची संधी या लिट फेस्टच्या माध्यमातून पुणेकरांना मिळाली. शांतता पुणेकर वाचत आहेत या उपक्रमात एकाच वेळी वाचन करणारे हजारो पुणेकर, भगवान बिरासा मुंडा यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त लारजेस्ट डिस्प्ले ऑफ पोस्टर्स आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पंचप्रण संकल्पनेनुसार हजारोंच्या उपस्थितीत वसुंधरा संरक्षणासाठी घेण्यात आलेली शपथ विश्वविक्रमांची नोंद महोत्सवा दरम्यान करण्यात आली. महोत्सवात ४९८ पुस्तकांचं प्रकाशन झालं. अनेक लेखक, साहित्यिक आणि कवींसह जवळ जवळ साडेबारा लाख नागरिकांनी या महोत्सवाला भेट दिली आणि ३० लाखांपेक्षा अधिक पुस्तकांची खरेदी केली, त्यातून ५० कोटींपेक्षा अधिक आर्थिक उलाढाल झाली, अशी माहिती महोत्सवाचे संचालक राजेश पांडे यांनी दिली. पुढच्या वर्षी १२ ते २० डिसेंबर या कालावधीत फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर पुणे पुस्तक महोत्सव होईल असंही त्यांनी सांगितलं.आकाशवाणी बातम्यांसाठी प्रसाद पाठक यांच्यासह प्रशांत जाधव पुणे*

**<u>बिबटे</u>**

अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील बिबट्यांचा वाढता वावर आणि मानवी वस्त्यांवरील हल्ल्यांच्या घटना रोखण्यासाठी वन विभागाने अत्याधुनिक यंत्रणेचा वापर करावा, अशा सूचना जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या आहेत. संगमनेर तालुक्यातील जवळे कडलग इथं बिबट्याच्या हल्ल्यात दगावलेल्या सिद्धेश कडलग याच्या कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतल्यानंतर ते काल बोलत होते. बिबट्यांची संख्या जास्त असलेल्या भागात ५०० हून अधिक 'ट्रॅप कॅमेरे' बसवण्यात आल्याचं विखे यांनी सांगितलं.

**<u>जनसमर्थ</u>**

शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटपाची प्रक्रिया सुलभ व्हावी तसंच पात्र आणि गरजू शेतकऱ्यांना तातडीने पीक कर्ज उपलब्ध व्हावं, यासाठी शासनाच्या कृषी विभागाने आता 'जनसमर्थ' हे नवीन ॲप आणि पोर्टल तयार केलं आहे. ज्या शेतकऱ्यांची ॲग्रीस्टॅकवर नोंदणी झालेली आहे, त्या शेतकऱ्यांनी जनसमर्थ ॲप वरुन कर्जाची मागणी केल्यास त्या शेतकऱ्यांना तातडीने घरबसल्या पीक कर्ज  उपलब्ध करुन दिलं जाणार आहे. यासाठी प्रायोगिक तत्वावर शासनाने सोलापूर जिल्ह्याची निवड केली आहे. जनसमर्थ ॲप आणि पोर्टलद्वारे पीक कर्ज मिळवण्यासाठी शेतकऱ्यांकडे फार्मर आयडी, आधार कार्ड, बँक पासबुक मोबाईल नंबरशी सलग्न असणे आवश्यक आहे. त्यासाठी तालुकास्तरावर शिबिर घेऊन ८३ हजारांहून अधिक शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात येणार आहे, असं सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितलं.

**<u>क्रिकेट</u>**

महिला क्रिकेटमध्ये भारत आणि श्रीलंका यांच्यात 20 षटकांचा दुसरा सामना आज विशाखापट्टणम् इथं होणार आहे. संध्याकाळी 7 वाजता सामना सुरू होईल. पाच सामन्यांच्या या मालिकेतला पहिला सामना भारतानं जिंकला आहे.

**<u>हवामान</u>**

राज्याच्या बहुतांश भागात किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय घट झाली आहे. पुणे, नाशिक, गोंदिया, यवतमाळ इथं पारा 10 अंशांच्या खाली घसरला आहे. काल अहिल्यानगर इथं राज्यात सर्वात कमी 7 पूर्णांक 3 दशांश अंश सेल्सियस किमान तापमानाची नोंद झाली. येत्या 24 तासात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.